MHYA130015622025

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश

सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ५०३ भारतीय न्याय सुरक्षा संहिता अन्वये सायबर सेल द्वारे गोठवलेली रक्कम सुपूर्तनाम्यावर परत मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

**०२.** अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार यांना दि. २३/११/२०२५ रोजी त्यांच्या मोबाईलवर जी.बी. 44 1904905808 आणि आय.एन. ९१८२५७९९३४०७ या मोबाईल क्रमांकावरुन कॉल करुन अर्जदार यांना असे सांगण्यात आले की, मी तुझा मित्र नामे नफिज शेख बोलतो मला मेडिकल एमर्जन्सि आहे, मला तु या ००३३२१७२१०८३००५ फोन पे. नंबर वर ४०,०००/— रु. पाठव. अर्जदार यांनी जवळचा विश्वासू मित्र असल्याने त्यांनी सांगीतले नंबरवर पैसे पाठवले. त्यानंतर पुन्हा काही तासानंतर पेशांची २०,०००/— रुपयांची मागणी होत राहली. त्यानंतर अर्जदार यांना शंका की, त्यांची फसवणुक होत आहे. तेव्हा त्यांनी कॉल कट करुन त्यांचा मित्र नामे नफिज शेख यांना कॉल केला असता त्यांनी पैस पाठवण्यासाठी कॉल केला नाही. तेव्हा अर्जदार यांना लक्षात आले की, त्यांची अज्ञात इसमाने आर्थिक फसवणूक करुन एकूण ४०,०००/— रु. ची फसवणूक केली. तेंव्हा अर्जदाराने दि. २४/११/२०२५ रोजी स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा, दिग्रस येथील मॅनेजर यांना सदर घटनेबाबत माहिती सांगीतले असता, त्यांनी सायबर सेल यवतमाळ यांच्या १३० या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती दिली. दि. २४/११/२०२५ ऑनलाईन फिर्याद दिली असता, त्यावेळी अर्जदारास कंम्पलेंट ॲकनॉलेजमेंट नं. ३१९११२५०२२४९१० असा मिळाला. त्यांनतर अर्जदार यांची झालेली ४०,०००/— रुपये फसवणुकी पैकी रु. ४०,०००/— हे सायबर सेल, यवतमाळ यांनी गोठविलेली आहे असे समजले.

**०३.** पो. नि. दिग्रस पोलीस स्टेशन यांनी ॲकनॉलेजमेंट नं. ३१९११२५०२२४९१० मध्ये तपास करून व पंचनामा करून सायबर

सेल, यवतमाळ यांनी रक्कम रु. ४०,०००/— गोठवलेली आहे. ती अर्जदाराची आहे. त्यामुळे अर्जदाराने ती त्याला परत करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

**०४.** सदरील अर्जामध्ये गोठवलेली रक्कम असलेल्या बॅकेला त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता नोटीस पाठविली. निशाणी ०७ वरील सायबर सेल यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये त्यांनी सदरील बॅकांना सांगीतले की त्यांनी सदरील बॅकेशी चर्चा केलेली असुन बॅकेने सदरील रक्कम ही अर्जदाराला परत करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगीतले आहे. तसेच सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या पानावर सादर करून कथन केले की, गोठवलेल्या रक्कम ४०,०००/— रु. रक्कमेपैकी आरोपीच्या खात्यामध्ये केवळ २३.८८ रु. शिल्लक आहेत त्यामुळे सदरील रक्कम अर्जदारास देता येणार नाही.

**०५.** तपासी अधिकारी/ सायबर सेल, यवतमाळ निशाणी ०७ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांच्या म्हणण्यात असे सांगीतले की, तक्रारदार यांनी नॅशनल सायबर क्राईम रिर्पोटींग पोर्टल १९३० या संकेत स्थळावर दि. २४/११/२०२५ रोजी तक्रार दाखल केली. त्याच सदर पोर्टलवर तांत्रिक विश्लेशन वरुन तक्रारदार यांना वेळो—वेळी त्यांच्या स्टेट बॅक ऑफ इंडिया खाते क्र. ३१४७४९१५२८१ यातुन पाठविलेली रक्कम खालील नमुद बॅक खाते यात मिळुन आल्याने पोर्टल द्वारे लिन करण्यात आले आहे. तसेच त्यांना त्यांच्या म्हणण्यात असे सांगीतले की, रक्कम गोठवण्यात आलेल्या बॅकेमध्ये रक्कम रु. २३.८८ फक्त शिल्लक आहे. त्यामुळे सदरील रक्कम अर्जदाराला मिळण्याकरिता हकरत नसल्याचे सांगीतले.

**०६.** वरील युक्तीवाद व म्हणणे यावरून असे दिसून येते ॲकनॉलेजमेंट नं. ३१९११२५०२२४९१० मधील तक्रार मधील रक्कम ही सायबर सेल, यवतमाळ यांनी गोठवलेली असल्याचे दिसून येते. तसेच नमुद गुन्हयातील सायबर सेल, यवतमाळ यांनी गोठवलेली रक्कमे पैकी खात्यात शिल्लक असलेली रक्कम २३.८८/— रुपये ॲकनॉलेजमेंट नं. ३१९११२५०२२४९१० मधील असल्याचे दिसून येते. तसेच सायबर सेल यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरील रक्कम हि

अर्जदाराच्या अकाउंट नं. ३१४७४९१५२८१ मधुन पाठवली असल्याचे सांगीतले आहे.

**०७.** त्यामुळे अर्जदार गुन्हयात गोठवलेली रक्कम रूपये २३.८८/— तातपुरत्या स्वरूपात मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***सुंदरभाई अंबालाल देसाई आणि सी.एम.मुदलीयार वि गुजरात सरकार, एआयआर.२००३ (सर्वोच्च न्यायालय) ६८.*** या न्यायनिर्णयामध्ये नमूद केलेल्या न्यायतत्वानुसार जप्त रक्कम पुढील आदेशापावेतो खालील अटींवर अर्जदास यांस परत करणे न्यायोचीत होईल असे मला वाटते. म्हणून मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. आनलाईन कंम्पलेंट ॲक्नॉलेजमेंट क्र. ३१९११२५०२२४९१० भा. न्या. सु. संहिता २०२३ चे कलम ५०४ अंतर्गत सायबर सेल, यवतमाळ यांनी गोठवलेली रक्कम रु. २३.८८/— ही सुपुर्दनाम्यावर अर्जदार **मजर हुसेन शेख** यांना रक्कम रु. २३.८८/— चे बंधपत्रावर करून देण्याच्या अटींवर व शर्तीसह परत करण्यात यावी.

३. अर्जदाराने बंधपत्र दिल्यानंतर वरील नमुद तक्रारीमधील गोठवलेली रक्कम रु. २३.८८/— ही अर्जदार यांना परत करण्यात यावी.

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.06.05 15:25:41 +0530

ठिकाण: दिग्रस
दि. ०५/०६/२०२६

(बा. ना. गोडबोले)
न्यायदंधाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र. १, दिग्रस

**Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 05/06/2026

Transcribed On : 05/06/2026

Checked & Signed On : 05/06/2026

Date :05/06/2026
Place : Digras.

**Sd/-**
**( N. S. Jadhao )**
Stenographer G-3
C.J.J.D. & J.M.F.C., Digras.